## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १२५/२०१२ मधील नि. ८४ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.९ तर्फे जादा मुद्दे काढण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, वादीने दाव्यामध्ये दि.०२/०१/२००८ रोजीच्या खरेदीखताने ते मालक झाले आहेत, दि.२४/०५/२०१४ रोजीचे खरेदीखत बेकायदेशीर असून ते वादीवर बंधनकारक नाही, दि.०७/०६/२०१० रोजीचे खरेदीपत्र बेकायदेशीर आहे असा जाहीर ठराव मागितला आहे. परंतु, वादीने दाव्याचे मुल्यांकन चुकीचे केले आहे. त्यामुळे वादीने दाव्याचे मुल्यांकन योग्य केले आहे का हा मुद्दा काढणे गरजेचे आहे. तसेच, वादीने जाहीर ठराव करुन मागितलेल्या खरेदीखताची किंमत पाच लाख रुपयांपेक्षा जास्त असल्याने या न्यायालयाला हा दावा चालविण्याचा अधिकार आहे का असा मुद्दा काढणे गरजेचे आहे.

३. वादीने दाव्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन त्याच्याकडे दावा मिळकतीचा कब्जा आहे. वादीने प्रतिवादीकडून दावा मिळकतीच्या कब्जाची मागणी केलेली नाही. त्यामुळे या स्वरुपात दावा न्यायालयात चालू शकणार नसल्याने दावा कायद्याने टिकण्यासारखा/समर्थनीय आहे का हा मुद्दा काढण्याची मागणी केली आहे.

४. वादीतर्फे या अर्जाला म्हणणे (नि.९०) दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, वादीने दाव्याचे मुल्यांकनाकरिता दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादीने कैफियतीमध्ये या न्यायालयास दावा चालविण्याचा अधिकार नाही असे

कथन केलेले नाही. त्यामुळे हे दोन्ही मुद्‌दे काढण्याची आवश्यकता नाही. वादीने या दाव्यापूर्वी दाखल केलेल्या नि.दि.दा.क्र९१/२०१० ची साक्षांकित प्रत दाखल केली असून त्यावरुन दावा मिळकतीवरील घर क्र.१४५ मधून वादीना प्रतिवादी क्र.१ ने बेदखल केल्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई केली आहे. तो दावा दि. १९/०३/२०१३ रोजी मंजूर झाला असून प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादींकडून पुन्हा कब्जा मागणेचा प्रश्न उद्‌भवत नसल्याने सदरचा मुद्‌दा देखील काढण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे दाव्याची सुनावणी लांबवण्यासाठी हा अर्ज दाखल केला असून तो नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादींतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

६. वादीतर्फे नि.८६ खाली दाव्याचे मुल्यांकनाबाबत दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये वादीने दाव्याचे मुल्यांकन दुरुस्त करुन मागितल्यामुळे वादीने दाव्याची आकारणी योग्य केली आहे का हा मुद्‌दा सद्यस्थितीत निश्चित करता येत नाही. नि. ८६ मधील आदेशाने दावा दुरुस्ती केल्यानंतर प्रतिवादीच्या कैफियतीनुसार हा मुद्‌दा विवादीत असल्यास निश्चित करता येईल. याखेरीज वादीने दावा दाखल करतांना त्याचे मुल्याकंन रक्कम रुपये १,२९,०००/— केल्यामुळे तो या न्यायालयाच्या आर्थिक अधिकारक्षेत्रात येतो. नि.८६ वरील आदेशानुसार दावा दुरुस्ती झाल्यास सदरचा दावा या न्यायालयाच्या आर्थिक अधिकार क्षेत्रात येतो का हे पहावे लागणार आहे. परंतु, तत्पूर्वी असे कोणतेही कथन वादी व प्रतिवादींच्या कथनामध्ये नसल्यामुळे प्रस्तुत दावा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे का असा मुद्‌दा निश्चित करता येत नाही. वादीने या दाव्यामध्ये तो वाद मिळकतीचा कब्जात आहे असे कथन करुन त्याअनुषंगाने जाहीर ठराव होवून निरंतर मनाईहुकूमाची

मागणी केली आहे. वादी अथवा प्रतिवादी दावा मिळकतीच्या कब्जात आहे का ही बाब उभयपक्षकारांचा पुरावा आल्याशिवाय निश्चित होणार नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या कथनावरुन दावा मिळकत वादीच्या कब्जात नाही. म्हणून त्यांनी प्रतिवादीकडून दावा मिळकतीच्या कब्जाची मागणी करावी व सदर मागणी केली नाही म्हणून दावा या स्वरुपात चालू शकत नाही असे केलेले कथन टिकू शकत नाही. त्यामुळे सदरचा मुद्दा देखील या परिस्थितीत निश्चित करता येत नसल्याने कोणताही नविन मुद्दा निश्चित करण्याची आवश्यकता नाही. करिता आदेश :—

**आदेश**

अर्ज नामंजूर.

सही/—

दिनांक : १२/०९/२०१७

( श्र.जि. डोलारे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत
जिल्हा—रायगड.